'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Vol. 3, Issue-4
ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

# मराठी संतसाहित्य

डॉ. रामदास रसाळ
प्रभारी प्राचार्य
कैलास शिक्षण मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय,
राहू, ता.दौंड, जि.पुणे, मो.नं. 9822656595

'संत' ह्या संज्ञेला धार्मिक, ऐतिहासिक आणि सामाजिक दृष्टीने काही अर्थ आहे, ही संकल्पना वाङमयक्षेत्रात फलदायी ठरेल अशा पध्दतीने वापरावयाची असेल तर तिची अर्थकक्षा निश्चित करून घ्यावी लागेल.

'संत' या संकल्पनेचा पहिला ठसठशीत उच्चार मराठीत मुक्तीबाईंच्या 'ताटीचे अभंग' मधून झालेला दिसतो. ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम, निळोबा, बहिणाबाई यांसारख्या संतांच्या उद्‌गारांतून संतलक्षणे समोर येतात. विठ्ठल हे उपास्यदैवत, नामस्मरण हे साधन, व्यक्तिमत्वाची शुध्दता व गुणसंपन्नता, आत्मोध्दाराबरोबर लाकोध्दाराची आस ही अशी लक्षणे आहेत. इतर सांप्रदायिकांपेक्षा वारक–यांना ती अधिक चपखलपणे लागू पडतात. त्यामागे एक सांस्कृतिक विचारधाराही आहे. तथापि, संत व संतसाहित्य या संज्ञा वारक–यांपुरत्या मर्यादित अर्थाने वापरणे मध्ययुगीन मराठी वाङमयाचे व्यवस्थापन करताना अडचणीचे ठरणारे आहे. त्यामुळे या सज्ञांचा अधिक विचार केला पाहिजे.

'संत' हा शब्द संस्कृत आहे. 'अस' म्हणजे होणे या धातूपासून होणारा, असणारा या अर्थाचे 'सन्' हे रूप तयार झाले. त्याचे बहुवचन 'संत' हे होय. मराठीत मात्र हा शब्द एकवचनी समजला जातो. 'संत' म्हणजे अस्तित्वात असणारा.त्याचप्रमाणे हिंदी, गुजराती यांसारख्या भारतीय भाषांतही हा शब्द वापरला जातो. कबीर, मीरा, नरसी मेहता ह्या संतांचा वारक–यांशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष अनुबंध दाखविता येईल. पण त्याशिवाय सुरदास, तुलसीदास हेही 'संत' म्हणून ओळखले जातात.'संत' शब्दाचा वापर कालदृष्ट्या वारकरी संतांच्या आधी दाखविता येतो. स्थलदृष्ट्या संप्रदायाच्या प्रभावकक्षेबाहेरही तो दाखविता येतो. भारतीय पातळीतरही त्याचा वापर झालेला दिसतो. मराठी परंपरेतही वारक–यांसह इतर सत्पुरूषांना 'संत' म्हणून संबोधल्याचे दाखविता येते. ते जसे आज दाखविता येते तसे मध्ययुगातही दाखविता येते. 'संत' या शब्दाचा उपयोग बहुधा बुध्दीमान किंवा परोपकारी, पवित्रात्मा, सदाचारी किंवा भक्त या अर्थांनी केला जातो, असे हे. वि. इनामदारांनी भागवतवादी ग्रंथ आणि कालिदास, भर्तृहरी, कबीर, तुकाराम, मुक्ताबाई यांच्या वचनांच्या आधाराने दाखविले आहे. या सामान्य अर्थाने वारक–यांबरोबर इतरही संप्रदायांतील सत्पुरूषांचा 'संत' या संज्ञेने निर्देश करणे योग्य ठरेल. संतसाहित्याची परंपरा आजही विद्यमान आहे, असे ज. वि. जोशी यांनी संपादित केलेल्या 'अर्वाचीन संतगाथा' च्या आधाराने म्हणता येईल. तथापि, संतपरंपरेचे उज्ज्वल आविष्कार प्रकटले ते तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंतच्या काळात. मध्ययुगीन मराठी जीवनाप्रमाणे संतसाहित्यही धर्मप्रधान आणि संप्रदायनिष्ठ आहे. संत कोणत्या ना कोणत्या धर्मसंप्रदायाचे अनुयायी आहेत. त्यांचे वाङमय सांप्रदायिक संस्कारांनी रंगलेले आणि त्यांच्या साधनप्रणालीतून उगम पावलेले आहे. म्हाइंभट, नामदेव, ज्ञानदेव, आणि मुकुंदराज हे मराठी संतसाहित्याचे आणि एकूणच वाङमयाचे आघाडीचे आणि आरंभीचे निर्माते आहेत. महानुभाव, वारकरी आणि नाथ या तिन्ही संप्रदायांशी ते अनुबंधित आहेत. हे संप्रदाय महाराष्ट्राच्या जनजीवनात

आरंभापासून दिसतात. दत्त, गाणपत्य, नागेश, आनंद, माधव, रामानुज, हरिणारायण हे पंथ पुढील टप्प्यावर क्रियाशील झालेले दिसतात. सतराव्या शतकात समर्थ संप्रदायाची धारा या प्रवाहाला येऊन मिळाली. भारतीय धर्मजीवनात केवळ वैदिक किंवा हिंदू नाहीत. त्यांच्याशिवाय बौध्द आहेत, जैन आहेत, सूफी, इस्लामी आहेत आणि ख्रिश्चन आहेत. वाङमयीन दृष्ट्या या सगळयांनी केलेली सांप्रदायिक साहित्यनिर्मिती ही प्रकृतीने संतसाहित्यच आहे, असे मी मानतो.

'संतसाहित्य' या संज्ञेने एका प्रकारच्या साहित्याचा बोध होत नाही. त्यात शास्त्रीय तत्वविवेचक, कथात्मक आणि काव्यात्मक असे विविध प्रकारचे स्फुट व दीर्घ, गद्य व पद्य वाङमय समाविष्ट होते.ते एकजातीय स्वरूपाचे साहित्य नाही. प्रकृतीने संमिश्र, प्रकाराने विविध आणि दर्जाने उंचसखल असे संतसाहित्याचे रूप आहे.हे सारेच लिखाण साहित्याची पातळी गाठते असेही नाही. पण त्यापैकी काही मात्र अव्वल दर्जाचे आहे, यात शंका नाही. आणि तेच डोळयापुढे ठेवून येथे संतसाहित्याची ओळख करून दिली आहे. एकूणच संतसाहित्य लोकसभेतून आणि लोकछंदातून अवतरले. त्यात लोकगीताची सरणी आहे आणि लोकतत्वाची गुंफण आहे. लोकजीवनातून वेचलेल्या प्रतिमांतून त्यांचे अनुभव बोलके झाले आहेत. संतकविता ही सादरकर्त्याच्या हुन्नरीने जिची खुमारी वाढते अशी मुख्यतः श्राव्य व क्वचित दृश्य कविता आहे. लोकसमूहाशी निगडित असलेल्या माध्यमातून त्यांनी आपले साहित्य वाहते केले. त्यामुळे समाजाच्या सगळया थरांतील लोकांना त्यांनी आपल्या साहित्यात सहभागी केले माथ्याचे ज्ञान त्यांनी पायथ्याजवळ आणले. या सगळयात अधिक यश वारकरी संतांनी मिळविले. त्यांच्या जीवनकार्याचा व साहित्याचा प्रभाव व्यापक जनजीवनावर साडेसातशे वर्षांहून अधिक काळ राहिला. संतसाहित्याचे आधुनिकतेशी काय नाते आहे; आज ते कितपत प्रस्तुत आहे; अशा त–हेचे प्रश्न खेड्यापाड्यात राहणा–या कष्टकरी बहुजनांना कधी पडत नाहीत. त्यांच्या दृष्टीने संतसाहित्य हे जिवंत साहित्य आहे. त्यांच्या दृष्टीने ते 'महाराष्ट्रवेद' आहेत. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकोबांची गाथा ही वारक–यांची प्रस्थानत्रयी आहे.

संतसाहित्याचा आजच्या आधुनिक काळाशी काही संबंध आहे, की नाही, असा प्रश्न पडतो तो मुख्यतः अभिजनवर्गाला. त्यांना ते आज गतार्थ झाल्यासारखे वाटते. मध्ययुगाच्या मौखिक संस्कृतीतून मराठी साहित्य मुद्रणाच्या अर्वाचीन युगात आले. त्याचबरोबर लिहिता–वाचता न येणारा मोठा वर्ग साहित्याच्या क्षेत्रातून बाहेर फेकला गेला. साहित्यव्यवहार हा आधुनिक शिक्षितांपुरताच मर्यादित झाला. जुने संस्कृतज्ञ शास्त्री आणि नवे आग्लशिक्षित यांचीच अल्पसत्ताक अभिरूची साहित्यव्यवहारावर नियंत्रण गाजवू लागली. या नव्याजुन्यांच्या साहित्याभिरूचीशी संतसाहित्याचा फारसा संवाद होऊ शकला नाही. जुने शास्त्री संस्कृतच्या चष्म्यातून मराठीकडे पाहत होते. संतसाहित्य हे संस्कृत साहित्याचे भाषांतर असून संस्कृत न जाणणा–यांच्या उपयोगांसाठी ते आहे. अशी किती तरी संस्कृतज्ञांची समजूत होती आणि अजूनही कोठे तुरळक दिसते. संस्कृत काव्याभिरूचीवर पोसलेल्या समीक्षकांना संतांपेक्षा पंत जवळचे वाटले. आजच्या सुशिक्षितांसमोर संतसाहित्याचे आजच्या आधंनिकतेशी नाते काय आहे? त्याचा जीवनसंदर्भ काय आहे? संतवाङमय आज प्रस्तुत आहे की नाही? असे प्रश्न उभे राहतात. त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न आपण या शोधनिबंधात करणार आहेत.

साहित्य आणि काळ यांचे नाते गुंतागुंतीचे असते. साहित्य जसे स्थलकालबध्द असते तसे स्थलकालातीतही असते. ते तसे वैश्वीक असते. तसे विशिष्टही असते. ही विशिष्टता साहित्याला प्राप्त होते ती त्याच्या जन्मविशिष्ट स्थलकालामुळे. साहित्य हा एक संवाद आहे. पण जे मृत झाले आहेत. त्यांच्याशी कोणालाही बोलता येत नाही. जे अजून जन्माला आलेले नाहीत त्याच्याशी बोलण्याची भाषा फसवी ठरू शकते. त्यामुळे लेखक प्राधान्याने बोलत असतो तो आपल्यासारख्या परिस्थितीत

जगणा–या माणसांशी या कालसंवादामुळे साहित्य आपल्या काळाशी जोडलेले असते. लेखकाचे अनुभव समकालीन जगण्याचे अनुभव असतात. त्याचे आशयद्रव्य समकालीन समाजातून उचलेलेले आणि व्यक्तिनातून उमललेले असते. त्याच्या जाणिवा आणि मूल्ये ही समकाळाने बांधलेली असतात.

संतसाहित्य निर्माण झाले मध्ययुगात; पण त्याची समिक्षा झाली ती आधुनिक युगात आपल्या काळात. या दोन काळात मूल्यात्मक अंतर होते. या अंतराचा परिणाम संतसाहित्याच्या आकलनावर आणि मूल्यमापनावर झाला. आपली एकूण जीवनशैली काय आहे; तिच्याशी संतविचाराचे कोणते नाते आहे; पूर्वपरंपरेशी संतांनी कोणता संवाद – विरोध साधला याचा विचार करण्याचे भान कोणाला राहिले नाही. युरोपीय जीवनशैलीच्या चौकटीत संतसाहित्याचे मूल्यमापन केले गेले. त्यात राष्ट्रवादी, बुध्दिवादी, उपयुक्ततावादी, परिवर्तनवादी, समतावादी अशी आधुनिक मूल्ये मानणारी मंडळी आघाडीवर होती. संतांनी मराठी भाषेची अभिवृद्धी करणारे सौंदर्यपूर्ण साहित्य निर्माण केले. आपल्या चारित्र्याने, शिकवणीने व साहित्याने संतांनी जातिसंघटनेची कर्मठ दृढता शिथिल केली. शूद्रांना जवळजवळ ब्राम्हणांच्या बरोबरीने आध्यात्मिक अधिकार आणि सामाजिक महत्व दिले. स्त्रिची पदवी वाढवून कौटुंबिक परस्परसंबंधांना पावित्र्य दिले. सामाजिक परस्परसंबंधात सहिष्णुता आणली. हिंदू – मुस्लिम संबंधात जवळीक निर्माण केली. कर्मकांठ, उत्सव, यात्रा, उपास, ज्ञान यांचे महत्व तुलनेने कमी करून प्रेम आणि श्रध्दा हा ईश्वरोपासनेचा उत्कष्ट मार्ग असल्याचे सांगितले. बहुदेवतावाद नियंत्रित केला. समाजाला एकात्म केले. विचार व कृती या दोन्ही दृष्टींनी राष्ट्राचे सामर्थ्य वाढविले. परकीय सत्तेच्या जागी स्वदेशी सत्तेची पुनर्स्थापना करण्यासाठी भारतातील कोणत्याही प्रांतापेक्षा, महाराष्ट्राला अधिक बळ पुरविले.

संतांनी समकाळात केलेल्या कार्याची फलश्रुती ही अशी संमिश्र आहे. तीत अधिक नेमकेपणा यावयाचा तर संतांच्या सामाजिक कार्याचा विवेक करताना आपला ऐतिहासिक विवेक अधिक डोळस असला पाहिजे.

लोकजीवनात उन्नत व्हावयाचे तर लोकभाषेला धर्मभाषेची प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. तिच्यात ज्ञानभाषेचे सामर्थ्य आणि साहित्याचे सौंदर्य आले पाहिजे. राजभाषा होऊनही ती सामान्यांना कळणारी असली पाहिजे. असे मध्ययुगीन लोकनेत्यांना वाटत होते. संतसाहित्याची आधुनिक वर्तमानाशी असलेली ओळख अशा अनेक अंगांनी दाखविता येईल.

**संदर्भ सूची :**

1. हे.वि. इनामदार, 'संत नामदेव', केसरी प्रकाशन, पुणे, 1970.
2. वा.म. जोशी, 'मनोहर', मे 1939.
3. वि.का. राजवाडे, 'मराठयांच्या इतिहासाची साधने', खंड 4, प्रस्तावना.
4. पु.ग. सहस्त्रबुध्दे,'माझे चिंतन', पुणे 1956 पृ.90.
5. रावसाहेब कसबे, 'संतवाङमयाचे पुनर्मूल्यांकन', समुचित, ऑनोडी 1986 पृ. 207 –2011.
6. यशवंत मनोहर, 'समाजप्रबोधन पत्रिका', जानेवारी–फेब्रुवारी 1983.
7. भा.पं.बहिरट व प. ज्ञा. भालेराव, 'वारकरी संप्रदायः उदय आणि विकास', व्हिनस प्रकाशन, पुणे 1988 पृ. 340 – 341
8. अशोक केळकर, 'भारतीय ललितकला, आधुनिक वयात येतात' पंचधारा एमेजू 1986पृश्ठ 33.
9. स.ज.भागवत, जीवनचिंतन पृ. 122.